# 'India Property Insider' debuts in UAE

**Publication:** **Pune Metro**; **Date:** 14 Apr 2015; **Edition:** Pune;
**Reporter:** Bureau
**Circulation:** 00; **Total Area:** 81.63 sq cm; **Page No.:** 3

## 'इंडिया प्रॉपर्टी इन्सायडर' यूएईत दाखल

मुंबई, : विख्यात मीडिया आणि पब्लिशिंग हाऊस असलेल्या यंग मीडियाने यूएईमधील भारतीयांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न म्हणून गल्फ न्यूज डेलीच्या संयुक्त विद्यमाने 'इंडिया प्रॉपर्टी इन्सायडर' नावाचे महत्त्वांकांक्षी मॅग्लॉईड सुरु केले आहे. टॅब्लॉईड फॉरमॅटमधील मॅगझिन असलेले मॅग्लॉईड यूएईतील भारतीयांना भारतातील रिअल इस्टेट क्षेत्रातील नीड टू नो (जाणून घेण्यास गरजेची) आणि नाईस टू नो (जाणून घेण्यास चांगली) अशी माहिती पुरवेल. अतिशय माहितीपर, प्रेरणादायी आणि चित्रमय असलेले हे मॅग्लॉईप आपल्या मायदेशामध्ये आपले स्वत:चे घर असावे अशी आस असलेल्या प्रत्येक एनआरआयची भावनिक आणि व्यवहार्य गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करते.या नव्या उपामाबद्दल बोलताना यंग मीडियाचे संस्थापक आणि संचालक श्री. विल्फ्रेड फर्नांडीझ म्हणाले, ''आखाती देशांमध्ये येऊन वसलेल्या एनआरआय समाजाला भारतातील रिअल इस्टेट क्षेत्रातील खास एनआरआय वर्गाकरिता अनुरुप अशा अद्ययावत बातम्या आणि सल्ले मिळवण्याची गरज भासत होती. इंडिया प्रॉपर्टी इन्सायडर हे एनआरआय वर्गाच्या या गरजांची पूर्तता करेल आणि भारतातील रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करताना त्यांना महितीवर आधारित निर्णय घेण्यास सक्षम करेल, असे आम्हाला खात्रीने वाटते.''